पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठाच्या शिव-वाणी कम्युनिटी रेडिओचे उद्घाटन करताना कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. एम. एस. महाजन, डॉ. शिवाजी जाधव, प्रा. एस. एस. महाजन, डॉ. शरद बनसोडे आदी.

# शिवाजी विद्यापीठात कम्युनिटी रेडिओ सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आणि समाज यांच्यामध्ये कम्युनिटी रेडिओ दुवा म्हणून काम करेल, असा विश्वास कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला.

शिव-वाणी कम्युनिटी रेडिओचे लोकार्पण स्वातंत्र्यदिनी कुलगुरू प्रा. शिर्के यांच्या हस्ते झाले. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीमध्ये सकाळी साडेनऊ वाजता हा समारंभ झाला.

डॉ. शिर्के म्हणाले, कम्युनिटी रेडिओसाठी कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी अमोल येडगे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर आदी मान्यवरांनी विद्यापीठाकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. विद्यापीठ त्या पूर्ण करण्याचा नक्कीच प्रयत्न करेल. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाअधिकारी श्रीमती सुहासिनी पाटील, अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. एस. महाजन, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. ए. जाधव, प्रा. डॉ. डी. एस. डेळेकर, डॉ. डी. बी. सुतार, शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, कम्युनिटी रेडिओचे नोडल ऑफिसर डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील उपस्थित होते.

पुढारी

# विदेशी भाषा प्रवेशासाठी २४ पर्यंत अर्ज भरण्याची मुदत

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातील शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी रशियन, जर्मन, जपानी, पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज भरण्याची मुदत २४ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे.

विदेशी भाषा विभागातर्फे एक वर्ष कालावधीचे रशियन, जर्मन, जपानी, पोर्तुगीज, फ्रेंच भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात येतात. अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रत्येकी ५० आहे. बारावी उत्तीर्ण किंवा समकक्ष प्रवेश अर्हता आहे. इतर कोणतेही शिक्षण घेत अथवा नोकरी करत हे अभ्यासक्रम करता येतात.

प्रवेशाची अधिक माहिती www. unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Admission २०२४ या लिंकवर उपलब्ध करून आहे. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य तत्त्वावर प्रवेश दिले जाणार आहेत.